महत्वाचे परिपत्रक

१९३

जा.क्र.सीपीएस/रा.की.नास्थर/२०१५-१६//गुनि-५/२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१
दिनांक२० जून २०१५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक ----------------------------(सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -------------------------(सर्व)
३. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद -------------------(सर्व)

**विषयः सन २०१५-१६ करीता विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करण्यासाठी रासायनीक कीडनाशकांचे दराबाबत...**

**संदर्भः** १) शासन निर्णय क्रं पीकरक्षा १०७९/६६११४/सीआर-६२६/५ए, दि. ९ मे १९८०
२) शासन निर्णय क्रं सीपीएस/१०९२/४१४१/केंनं २१५/७ए, दि. १७ जुलै १९९३
३)शासन निर्णय क्र. सुकृऔ-२०१३/प्रक्र.६३/११अे, दि. ७/६/२०१३.
४) आयुक्तालयस्तरावरील दर निश्चिती समितीची सभा दि.१० /०६/२०१५

**पार्श्वभूमी :**

राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत अभियानांतर्गत/ योजनांतर्गत विविध कृषि निविष्ठांचा अनुदानावर पुरवठा करण्यासाठी शासनानेदिनांक ७/६/२०१३ च्या शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची **एकमेव पुरवठादार संस्था** म्हणून नियुक्ती केलेली आहे.

शासन निर्णय क्रं.सीपीएस/१०९२/४१४१/कें.नं.२१५/७-ए, दि. १७ जुलै, १९९३ नुसार जी कीड़नाशके महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वत: उत्पादीत करते त्यांचा शासकीय योजनांतर्गत पुरवठा त्यांचेकडूनच करण्याचे शासनाचे धोरण आहे.

**१. सन २०१५-१६ साठी कीडनाशकांचे दर :**

सन २०१५-१६ मध्ये राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत अभियानांतर्गत/योजनांतर्गत राबविण्यात येणा-या पीक संरक्षण मोहिमांसाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ यांचेमार्फत पुरविण्यात येणा-या पीक संरक्षण औषधांचे पॅकींग साईजनिहाय दर सोबत सहपत्रित केले आहेत. सदर दर हे किडनाशके तालुकास्तरापर्यंत पुरवठा करण्यासाठीचे आहेत. शासकीय योजनांखालील पुरवठ्याचे दर खुल्या बाजारातील त्याच दर्जाच्या किडनाशकांच्या दरापेक्षा जास्त राहणार नाहीत याची खात्री करण्याच्या दृष्टीने खुल्या बाजारातील दरांची चौकशी करावी. किडनाशकांच्या तांत्रिक नावाने दरपत्रकात दर दर्शविण्यात आले आहेत. जी औषधे आय.एस.आय. मार्क आहेत, त्यांचे समोर आयएसआय मार्क असे नमूद केले आहे. पुरवठा संस्थेच्या विनंतीनुसारज्या नॉन आय.एस.आय. दर्जाच्या किडनाशकांच्या पुरवठयास मान्यता दिली आहे, त्याबाबत दर्जाची हमी पुरवठा संस्थेची राहील. मात्र, अशा किडनाशकांच्यानमुन्यांची तपासणी आय.एस.आय. मानकांनुसारच करण्यात येईल याची सर्व संबंधितांनो नोंद घ्यावी.

सन २०१५-१६ करीता रासायनिक कीड नाशकांचे दर निश्चित करण्यात आले असून ते या परीपत्रकासोबत सहपत्रीत करण्यात आले आहेत. सदर दर हे सन २०१५-१६ करिता लागू राहतील.

**२. कीडनाशकांची मागणी नोंदविणे प्रक्रीया :**

सोबतच्या दर पत्रकात दर्शविलेल्या कीटकनाशके/बुरशीनाशके/तणनाशके यांची मागणी व पुरवठ्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**२.१:** दर पत्रकातील **अ.क्र.अ.**मधील **क्र.१ ते १६** मध्ये नमुद कीटकनाशके/बुरशीनाशके यांचे उत्पादन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येत असल्याने संदर्भीय दि.१७ जुलै, १९९३ च्या शासन

निर्णयानुसार त्यांचा पुरवठा केवळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फतच करण्यात येईल. त्यामुळे, सदर कीटकनाशके/बुरशीनाशके/तणनाशके यांची मागणी केवळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडेच नोंदवावी.

**२.२:** शासकीय योजनेतंर्गत किडनाशकांचा पुरवठा हा केवळ तांत्रिक नावानेच करण्यात येत असल्याने कोणत्याही परिस्थितीत विशिष्ठ ब्रॅण्डच्याकिडनाशकांच्या पुरवठयासाठी पुरवठा संस्थेकडे आग्रह धरु नये.

**२.३:** विविध योजनांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या जिल्हयासाठी मंजूर आर्थिक/भौतीक लक्षांकाचे अधिन राहुन व कीड/रोगाच्या प्रादुर्भावाचे तिव्रतेनुसार केंद्रीय कीटकनाशक मंडळाचे मंजूर लेबल क्लेम्स व पीक संरक्षण शिफारस पुस्तिकेत शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणे संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आपल्या जिल्ह्याची पीक संरक्षण औषधांची मागणी संबंधीत पुरवठा संस्थांकडे नोंदवावी. त्यासोबत तालुकानिहाय औषध पुरवठयाचा सविस्तर तपशिल पुरवठा संस्थेच्या जिल्हा/विभागीय कार्यालयास कळवावा. जेणेकरुन नियोजनबद्ध व वक्तशीर पुरवठा करणे शक्य होईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये मंजूर आर्थिक/भौतीक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी किंवा शिफारस न केलेल्या औषधांची मागणी पुरवठा संस्थाकडे नोंदविण्यात येऊ नये. अतिरिक्त मागणी नोंदवून साठा शिल्लक राहील्यास त्यास संबधित मागणी नोंदविणा-या अधिका-यास जबाबदार धरले जाईल व अशा साठ्याची संपुर्ण रक्कम संबंधित मागणी नोंदविणा-या अधिका-याकडुन वसुल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**२.४:** तणनाशके ही पिकासाठी अती संवेदनशील असल्याने त्यांचा वापर करताना लेबल क्लेमवर नमुद असलेल्या वापराबाबतच्या सुचनांप्रमाणेच योग्य तणनाशकांचा वापर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तणनाशकांचा वापर करताना स्प्रेपंपाची स्वच्छता व योग्य प्रकारच्या नोझलचा वापर करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात जेणेकरुन पिकाचे नुकसान होणार नाही.

**२.५:** मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी जनहीत याचिका क्र. २१३/२०११ च्या अनुषंगाने दि.१३/५/२०११ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास अनुसरून केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. १३०३३/६/२०१११ पीपीआय, दि. १४/५/२०११ अन्वये एन्डोसल्फान या कीटकनाशकाच्या उत्पादन, विक्री व वापरावर पुढील आदेश होईपर्यंत बंदी घातली आहे. त्यामुळे एन्डोसल्फानचे दर निश्चित केले नाहीत.

**३. कीडनाशकांची गुणवत्ता तपासणी :**

**३.१ :** रासायनिक कीटकनाशकांच्या **पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणीसाठी** उत्पादनस्थळी/ गोदामस्तरावर साठा उपलब्ध झाल्याबरोबर प्रत्येक बॅचचा संबधित जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक यांनी किमान एक तरी नमुना काढून तो संलग्न शासकीय कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासून घ्यावा. याकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकास तशा सुचना द्याव्यात व तसे पुरवठा संस्थेस कळवावे. **विश्लेषणात नमुना प्रमाणीत घोषीत झाल्यास सदर बॅचचा साठा पुरवठ्यासाठी मुक्त करावा व पुरवठा करताना त्याचा विश्लेषण अहवाल सोबत द्यावा.** कोणत्याही परिस्थितीत पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणी न करता किंवा पुरवठा पूर्व गुणवत्ता तपासणीत अप्रमाणित घोषीत झालेल्या किटकनाशकांचा पुरवठा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संपूर्णतः संबधीत पुरवठा संस्थेची राहील. राज्याबाहेरील उत्पादकांबाबत ही कार्यवाही साठवणूक स्थळी करणे बंधनकारक राहील. त्यासाठी पुरवठा संस्थांनी राज्याबाहेरील उत्पादकांच्या साठवणूक स्थळाची माहिती संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांना द्यावी.

**३.२ :** प्रत्येक तालुक्यात पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रत्येक बॅचचे तालुकानिहाय रॅण्डम पध्दतीने संबंधित गुणवत्ता निरिक्षकाने किटकनाशक अधिनियम, १९६८ व नियम १९७१ मधील तरतूदीनुसार त्वरीत नमुने घेऊन संलग्न शासकीय / कृषि विद्यापीठांच्या प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासून घ्यावा. विश्लेषण अहवाल प्राप्त करुन देण्यास १० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही, याची दक्षता शासकीय / कृषि विद्यापीठांच्या प्रयोगशाळांनी घ्यावी. विश्लेषणांतर्गत ज्या तालुक्यात ज्या बॅचचा नमुना अप्रमाणित घोषित होईल त्या बॅचची देयके आदा न करण्याची दक्षता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी. ती त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील. तसेच अशा नमुन्याबाबत किटकनाशक अधिनियम, १९६८ व नियम १९७१ मधील तरतूदी नुसार कार्यवाही करावी.

४. **देयकांची अदायगी :**

ज्या योजनेखाली किडनाशकाची मागणी नोंदविली आहे, त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लाभधारकांची निवड करणे व अनुदान मर्यादा देय राहील.कीडनाशकांचे लाभार्थींना वाटप करताना लाभधारकांकडून अनुदान वजा जाता लाभार्थी हिस्सा जमा करुनच वाटप करावयाचे असल्याने लोकवाट्याची रक्कम संबंधीतांनी १५ दिवसात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे जमा करावी. **लोकवाट्याची रक्कम पुरवठा संस्थेकडे लोकवाट्यापोटी जमा करायची असल्याने कोणत्याही परिस्थीतीत सदर रक्कम चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणा करण्यात येवू नये.** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर रक्कम तात्काळ पुरवठा संस्थेस अदा करावी. सदर रक्कम वेळेवर भरणा न केल्यास शासकीय रकमेचा अपहार या सदराखाली संबंधितांविरुध्द तात्काळ कार्यवाही करावी व रक्कम वसुल करुन भरणा करण्याची कार्यवाही करावी. याबाबीचे संनियंत्रण करण्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. योजनांतर्गत अनुदानाची रक्कम परस्पर पुरवठा संस्थेस वेळेवर अदा करावी. देयकांचे अदायगीस विनाकारण विलंब झाल्यास त्यास संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, यांना जबाबदार धरण्यात येईल.

**रासायनीक कीटकनाशकांचे नमुने अप्रमाणीत आल्यास अशा नमुन्यांच्या बाबत लोकवाटा/ वर्गणी शेतकऱ्यांकडून जमा केली असल्यास व ती पुरवठादार संस्थेकडे जमा केली नसल्यास संबंधित शेतकऱ्यांना परत करावी. लोकवाटा / वर्गणी पुवठादार संस्थेकडे जमा केली असल्यास ती पुरवठादार संस्थेच्या देयकातून वजा करुन संबंधीत शेतकऱ्यांना परत करावी. वाटप केलेल्या निविष्ठांची शेतकरीनिहाय नोंद ठेवावी.**

विविध योजनांतर्गत मार्गदर्शक सूचना तसेच निविष्ठांच्या पुरवठ्याबाबत काही अडचणी असल्यास त्यासाठी योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करणा-या संबंधित कार्यासनांशी संपर्क साधावा.

**सहपत्र**- दरांचा तक्ता

कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत :-**

१)**मा. अप्पर मुख्य सचिव**, (कृषि व पणन) कृषि व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, मत्सव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२)**मा. आयुक्त कृषि,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३)**मा. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी, दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व) मुंबई-६५, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.आपणांस विनंती की, वेळोवेळी कळविण्यात येणा-या जिल्हानिहाय पुरवठा कार्यक्रमाप्रमाणे कीडनाशकांचा वक्तशीर पुरवठा गटपातळीपर्यंत करण्याची कृपया व्यवस्था करावी. आपणाकडून पुरविण्यात येणा-या कीडनाशकांच्या दर्जाबाबत खात्री करुनच पुरवठा करावा.

४)**कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)/कृषि संचालक (फलोत्पादन)** यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव समादराने. विविध योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या रासायनिक किडनाशकांच्या अनुदानाच्या दरांची मर्यादा ठरविण्याची कार्यवाही कृपया आपल्यास्तरावरुन तात्काळ करावी.

५)**मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी**, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

६)**कृषि उपसंचालक-**पीक संरक्षण/गळितधान्य/कडधान्य/नगदी पीके/तृणधान्ये, नियोजन व फलोत्पादन यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

## सन २०१५-१६ मध्ये विविध पीक संरक्षण मोहिमांतर्गत पुरविण्यात येणा-या रासायनिक किटकनाशकांचे पॅकिंगनिहय दर दर्शविणारा तक्ता

| अ. न. | कीटकनाशकाचे नाव | पॅकींग साईज | सन २०१५-१६ करिता निश्चित करण्यात आलेले दर प्रती युनिट (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वतः उत्पादित करित असलेल्या किटकनाशकांचे सादर केलेले दर | | | |
| १ | क्विनॉलफॉस २५ टक्के इ.सी.(आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | १०८.०० |
| | | ५०० मि.ली. | १९०.०० |
| | | १ लिटर | ३६७.०० |
| २ | क्लोरोपायरीफॉस २० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | ९०.०० |
| | | ५०० मि.ली. | १४०.०० |
| | | १ लिटर | २६३.०० |
| ३ | मॅलेथिऑन ५० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | ५०० मि.ली. | १४२.०० |
| | | १ लिटर | २७५.०० |
| ४ | इमीडॅक्लोरोप्रीड १७.८ टक्के (नॉन आयएसआय) | ५० मि.ली. | ६३.०० |
| | | १०० मि.ली. | ११०.०० |
| | | २५० मि.ली. | २६३.०० |
| | | ५०० मि.ली. | ४९४.०० |
| ५ | सी.ओ.सी.५० टक्के डब्ल्युपी. (आयएसआय) | ५०० ग्रॅम | २४२.०० |
| ६ | कार्बनडायझीम ५० डब्लू.डी.पी. (आयएसआय) | १०० ग्रॅम | ५०.०० |
| | | २५० ग्रॅम | ११२.०० |
| | | ५०० ग्रॅम | २१४.०० |
| | | १ किलो | ४१७.०० |
| ७ | मॅन्कोझेब ७५ डब्लू.पी. (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | १७३.०० |
| ८ | मेटॅलॅक्झिल एम.झेड. ७२ टक्के डब्ल्यु पी (नॉन आयएसआय) | २५० ग्रॅम | २२९.०० |
| | | ५०० ग्रॅम | ४२४.०० |
| ९ | सायपरमेथ्रीन २५ टक्के इ.सी. (नॉन आयएसआय) | १०० मि.ली. | ५७.०० |
| | | २५० मि.ली. | १०३.०० |
| | | ५०० मि.ली | २०५.०० |
| | | १ ली | ४०१.०० |
| १० | डायमेथेएट ३० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | ९५.०० |
| | | ५०० मि.ली. | १६४.०० |
| | | १ लिटर | ३०५.०० |
| ११ | मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस.एल. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | ११२.०० |
| | | ५०० मि.ली. | २१२.०० |
| | | १ लिटर | ४०५.०० |
| १२ | ॲसिटॅमिप्रिड २० टक्के एसपी( नॉन आयएसआय) | ५० ग्रॅम | ६६.०० |
| | | १०० ग्रॅम | १२५.०० |
| | | २५० ग्रॅम | २८७.०० |
| १३ | हेक्झाकोनॅझॉल ५ टक्के एससी (नॉन आयएसआय) | ५०० मिली | १५८.०० |
| | | १ लि. | २८०.०० |
| १४ | फेनव्हलरेट २०टक्के ईसी | ५०० मिली | १६४.०० |
| | | १ लि. | २९५.०० |
| १५ | ॲसीफेट ७५ टक्के एस.पी (नॉन आयएसआय) | २५० ग्रॅम | १६४.०० |
| | | ५०० ग्रॅम | ३१५.०० |
| | | १ किलो | ६३०.०० |
| १६ | ट्रायझोफॉस ४० टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | ११८.०० |
| | | ५०० मि.ली. | २२८.०० |
| | | १ लिटर | ४३४.०० |

| अ. न. | कीटकनाशकाचे नाव | पॅकींग साईज | सन २०१५-१६ करिता निश्चित करण्यात आलेले दर प्रती युनिट (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **ब. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वतः उत्पादित करित नसलेल्या किटकनाशकांचे सादर केलेले दर** | | | |
| १ | बुप्रोफेजिन २५ टक्के एस.सी (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | १२०.०० |
| | | ५०० मि.ली. | २२८.०० |
| २ | इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. (नॉन आयएसआय) | ५० ग्रॅम | २५०.०० |
| | | १०० ग्रॅम | ४२५.०० |
| | | २५० ग्रॅम | १०१५.०० |
| | | ५०० ग्रॅम | २०१०.०० |
| ३ | लॅम्डासायहॅलोथ्रीन ५ टक्के ई.सी.(नॉन आयएसआय) | २५० मिली | ९०.०० |
| | | ५०० मिली | १७०.०० |
| | | १ लि. | ३२०.०० |
| ४ | थायोमिथॉक्झीम २५ टक्के डब्ल्यु जी (नॉन आयएसआय) | १०० ग्रॅम | ८६.०० |
| | | २५० ग्रॅम | १९८.०० |
| | | ५०० ग्रॅम | ३०६.०० |
| ५ | प्रोपीकोनॅझोल २५ टक्के ई.सी (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | १७५.०० |
| | | ५०० मि.ली. | ३३९.०० |
| | | १ लिटर | ६६८.०० |
| ६ | ग्लायफोसेट ४१ टक्के एस.एल. (नॉन आयएसआय) | ५०० मि.ली. | १५०.०० |
| | | १ लिटर | २८०.०० |
| ७ | कार्टेप हायड्रोक्लोराईड ५० टक्के एस.पी. (नॉन आयएसआय) | १०० ग्रॅम | ८२.०० |
| | | २५० ग्रॅम | १९४.०० |
| ८ | ट्रायसायक्लॅझोल ७५ टक्के डब्ल्यु पी (नॉन आयएसआय) | १०० ग्रॅम | ११५.०० |
| | | २५० ग्रॅम | २६०.०० |
| | | ५०० ग्रॅम | ५४५.०० |
| ९ | स्ट्रेप्टोसायक्लीन (नॉन आयएसआय) | ६ ग्रॅम | २५.०० |
| १० | फिप्रोनिल ५ टक्के एस.सी (नॉन आयएसआय) | २५० मिली | १६५.०० |
| | | ५०० मिली | ३१९.०० |
| | | १ लि. | ६२८.०० |
| ११ | प्रोफेनोफॉस ५० टक्के ई.सी (नॉन आयएसआय) | २५० मिली | १३१.०० |
| | | ५०० मिली | २५०.०० |
| | | १ लि. | ४८०.०० |
| १२ | ॲट्राझीन ५० टक्के डब्ल्यु.पी (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | १६०.०० |
| | | १ किलो | ३१०.०० |
| १३ | ऑक्झीफ्ल्युरोफेन २३.५ टक्केई.सी (नॉन आयएसआय) | १०० मि.ली. | १५५.०० |
| | | २५० मि.ली. | ३७८.०० |
| | | ५०० मि.ली. | ७४५.०० |
| १४ | इमॅझिथायपर १० टक्के एस एल (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | ३१५.०० |
| | | ५०० मि.ली. | ६००.०० |
| | | १ लि. | ११४०.०० |
| १५ | पॅराक्वॅट डायक्लोराईड २४ टक्के एस. एल. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | ९५.०० |
| | | ५०० मि.ली. | १७९.०० |
| | | १ लि. | ३४७.०० |
| १६ | डायक्लोरोव्हॉस ७६ टक्के ईसी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | १२१.०० |
| | | ५०० मि.ली. | २३०.०० |
| | | १ लि. | ४४०.०० |
| १७ | फोरेट १० टक्के जी (आयएसआय मार्क) | १ किलो | ७०.०० |
| १८ | पेंडीमिथीलीन ३० टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | १००.०० |
| | | ५०० मि.ली. | २००.०० |
| | | १ लि. | ३७०.०० |

| अ. न. | कीटकनाशकाचे नाव | पॅकींग साईज | सन २०१५-१६ करिता निश्चित करण्यात आलेले दर प्रती युनिट (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९ | सल्फर ८० टक्के डब्ल्यु पी. (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | ४२.०० |
| | | १ किलो | ८०.०० |
| २० | एन ए. ए. (नॉन आयएसआय) | १०० मि.ली. | ४२.०० |
| | | २५० मि.ली. | ९०.०० |
| २१ | पायरॅझोसल्फयुरॉन ईथिल १० टक्के डब्ल्यु. पी. (नॉन आयएसआय) | २० ग्रॅम | ६४.०० |
| | | ८० ग्रॅम | २४८.०० |
| | | १२० ग्रॅम | ३६०.०० |
| २२ | फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्लु जी | १०० ग्रॅम | ७२०.०० |
| | | २५० ग्रॅम | १७६२.०० |
| | | ५०० ग्रॅम | ३३११.०० |
| २३ | फ्लोनिकामीड ५० टक्के डब्लू जी | ३० ग्रॅम | २६६.०० |
| | | ६० ग्रॅम | ५२३.०० |
| | | १५० ग्रॅम | १२५४.०० |
| २४ | कॅप्टन ५० टक्के डब्लु जी | १०० ग्रॅम | ४९.०० |
| | | २५० ग्रॅम | ११७.०० |
| | | ५०० ग्रॅम | २२३.०० |
| २५ | थायाफिनेट मिथाईल ७० टक्के डब्लु पी | २५० ग्रॅम | १५१.०० |
| | | ५०० ग्रॅम | २९०.०० |
| २६ | मेट्राब्युझीन ७० टक्के डब्लु पी | १०० ग्रॅम | १२८.०० |
| | | २५० ग्रॅम | २९५.०० |
| | | ५०० ग्रॅम | ६०८.०० |
| २७ | २-४ डी इथिल ईस्टर ३८ टक्के ईसी | २५० मिली | ७०.०० |
| | | ५०० मिली | १२८.०० |
| | | १ लिटर | २३९.०० |
| २८ | प्रोपीक्यूझाफोप १० टक्के इ सी | १०० मिली | १८५.०० |
| | | २५० मिली | ४४०.०० |
| | | ५०० मिली | ८७०.०० |
| | | १ लिटर | १७००.०० |
| २९ | पेन्डामेंथिलीन ३८.७ टक्के सी एस | ३५० मिली | २४०.०० |
| | | ७०० मिली | ४७०.०० |
| ३० | व्हॅलेडामायसीन ३ एल | ५० मिली | २९.०० |
| | | १०० मिली | ४६.०० |
| | | २५० मिली | १००.०० |
| ३१ | ऑझेस्ट्रोबीन २३.७ टक्के ए.स | ५० मिली | २५०.०० |
| | | १०० मिली | ४९०.०० |
| | | २०० मिली | ९६०.०० |
| ३२ | ॲसीफेट ५० टक्के +ईमिडाक्लोप्रीड १.८ टक्के एस पी | २५० ग्रॅम | १६०.०० |
| | | ५०० ग्रॅम | ३१०.०० |
| | | १ किलो | ६१०.०० |
| ३३ | कार्बनडीझम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के डब्लु पी | १०० ग्रॅम | ४५.०० |
| | | २५० ग्रॅम | १०५.०० |
| | | ५०० ग्रॅम | १९५.०० |
| | | १ किलो | ३८०.०० |
| ३४ | डायुरॉन ८० टक्के डब्लु पी | ५०० ग्रॅम | ३९५.०० |
| ३५ | मेटासल्फुरॉन मिथिल २० टक्के डब्ल्यु पी | ८ ग्रॅम | ३७.०० |
| | | १६ ग्रॅम | ७१.०० |
| ३६ | सलफोसफ्ल्युरोन ७५ टक्के डब्ल्यु जी | ८ ग्रॅम | २६६.०० |

कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१